माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १२९७/२०२१**

**अपिलार्थी, श्री. प्रशांत निंबराव डोंगरे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षक,**
लाल बहादुर विद्यालय, बाम्हणी, ता. उमरेड, जि. नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
लाल बहादुर विद्यालय, बाम्हणी, ता. उमरेड, जि. नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २०.०२.२०२३**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : अनुपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०९.०२.२०२१ | ०१.०३.२०२१ | ०९.०३.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०९.०२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " मा. जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ३०.१२.२०२० जा.क्र.१५/२०२० दि. २९.१२.२०२० नुसार उतारा क्र.०२ ओळ क्र.५ नुसार उल्लेख असल्याप्रमाणे दुय्यम सेवापुस्तिका मला शाळेतर्फे देण्यात आली तर ती सेवापुस्तिका मला दिली याची मी दिलेली पोहच ची प्रमाणित प्रत व दिनांकाविषयी माहिती पुरविण्यात यावी" इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१.०३.२०२१ रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होऊन **दिनांक ०९.०३.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " जन माहिती अधिकारी यांनी खोटी व बनावटी माहिती पाठविल्यामुळे व जाणीवपूर्वक योग्य व खरी माहिती देण्याचे टाळल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ११.०६.२०२१ रोजी** " माहिती पुरविली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २०.०२.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून विद्यमान प्रथम अपिली अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. हरिश्चंद्र रा. तरवटकर उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१.०३.२०२१ रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. मात्र ही माहिती बनावट असल्याचा अपिलार्थी यांनी दावा केलेला असून त्याविरुध्द व्दितीय अपील दाखल केले आहे. सादर केलेल्या खुलाश्यात अपिलार्थी श्री. डोंगरे यांनी दुय्यम सेवापुस्तिका त्यांना शाळेतर्फे देण्यात आली तर ती सेवापुस्तिका त्यांना दिली याची त्यांनी दिलेली पोहच ची प्रमाणित प्रत व दिनांकाविषयी माहिती मागितलेली असता, त्यानुसार त्यांना माहिती दिलेली असता, दिलेली माहिती बनावट असल्याचा खोटा आक्षेप त्यांनी नोंदविलेला आहे. अपिलार्थी हे वारंवार संबंधित विद्यालयाकडे माहिती अर्ज दाखल करीत असून एकाच स्वरुपाची माहिती वारंवार मागत असतात. त्यानुसार त्यांना संपूर्ण माहिती ही अनेक प्रकरणात प्रदान केलेली असल्याचे प्राधिकरणाच्या वतीने नमूद करण्यात आलेले आहे. ही बाब लक्षात घेता, यासंदर्भात मा. केंद्रीय माहिती आयोग यांनी H.K. Bansal - Vs – Department of Telecommunication, New Delhi Order date १८.०३.२०१६ या आदेशातील परिच्छेद क्र. १५, १६ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

१५. In relation to the multiple/indiscriminate filing of RTI application, Hon'ble Delhi High Court in **Shail Saini Vs. Sanjeev Kumar [W.P (c) No. ८४५/२०१४]** had observed as follows:

५. In the opinion of this Court, the primary duty of the officials of Ministry of Defence is to protect the sovereignty and integrity of India. If the limited manpower and resources of the Directorate General, Defence Estates as well as the Cantonment Board are devoted to address such meaningless queries, this Court is of the opinion that the entire office of the Directorate General, Defence Estates Cantonment Board would come to stand still. The Supreme Court in ***CBSE vs. Aditya Bandopadhyay***,(२०११) ८ SCC ४९७, has held as under:

६२. *When trying to ensure that the right to information does not conflict with several other public interests (which includes efficient operations of the Governments, preservation of confidentiality of sensitive information, optimum use of limited fiscal resources, etc.), it is difficult to visualise and enumerate all types of information which require to be exempted from disclosure in public interest. The legislature has however made an attempt to do so. The enumeration of exemptions is more exhaustive than the enumeration of exemptions attempted in the earlier Act, that is, Section ८ of the Freedom to Information Act, २००२. The courts and Information Commissions enforcing the provisions of the RTI Act have to adopt a purposive construction, involving a reasonable and balanced approach which harmonizes the two objects of the Act, while interpreting Section ८ and the other provisions of the Act.*

६७. *Indiscriminate and impractical demands or directions under the RTI Act for disclosure of all and sundry information (unrelated to transparency and accountability in the functioning of public authorities and eradication of corruption) would be counterproductive as it will*



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर कार्यालय * नागपूर *
सत्यमेव जयते

*adversely affect the efficiency of the administration and result in the executive getting bogged down with the nonproductive work of collecting and furnishing information.*
*The Act should not be allowed to be misused or abused, to become a tool to obstruct the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to do their duty. The nation does not want a scenario where ७५% of the staff of public authorities spends ७५% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and the pressure of the authorities under the RTI Act should not lead to employees of a public authorities prioritizing "information furnishing", at the cost of their normal and regular duties.*

६. After all disproportionate diversion of limited resources to Directorate General,Defence Estates' office would also take its toll on the Ministry of Defence. The Supreme Court in ***ICAI vs. Shaunak H. Satya***, (२०११) ८ SCC ७८१ has held as under:-

३९. *We however agree that it is necessary to make a distinction in regard to information intended to bring transparency, to improve accountability and to reduce corruption, falling under Sections ४(१)(b) and (c) and other information which may not have a bearing on accountability or reducing corruption. The competent authorities under the RTI Act will have to maintain a proper balance so that while achieving transparency, the demand for information does not reach unmanageable proportions affecting other public interests, which include efficient operation of public authorities and the Government, preservation of confidentiality of sensitive information and optimum use of limited fiscal resources. Consequently, this Court deems it appropriate to refuse to exercise its writ jurisdiction. Accordingly, present petition is dismissed.* ***This Court is also of the view that misuse of the RTI Act has to be appropriately dealt with otherwise the public would lose faith and confidence in this "sunshine Act". A beneficent Statute, when made a tool for mischief and abuse must be checked in accordance with law.*** *A copy of this order is directed to be sent by the Registry to Defence and Law Ministry, so that they may examine the aspect of misuse of this Act, which confers very important and valuable rights upon a citizen.*

16. “Filing of multiple RTI on the same subject creates fear among the public authority. The feel tormented by such disgruntled/retired employees consuming through RTI their precious resource apart from causing mental agony. As observed by the Hon’ble High Court, “a beneficent Statute, when made a tool for mischief and abuse must be checked in accordance with law.”

त्यात असे नमूद केले की, "अशाप्रकारे कार्यरत कर्मचारी अथवा सेवानिवृत्त/माजी कर्मचारी जर आपल्या कार्यालयातील सहका-यांना/अधिका-यांना वारंवार माहिती अर्ज सादर करुन त्रास देत असतील तर हे माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग असल्याचे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. अशा प्रकारे माहिती अधिकाराचा दुरुपयोग करणा-या अर्जदाराला प्रतिसाद दिला जाऊ नये," असा प्रकारचा निर्णय दिला आहे.

मा. केंद्रीय माहिती आयोग यांनी त्यांच्या आदेशात नमूद केलेले दिशानिर्देश स्वंयस्पष्ट असून सदर प्रकरणात दाखल केलेल्या माहिती अर्जात तंतोतंत लागू पडतो. त्यामुळे मा. केंद्रीय माहिती आयोग यांनी दिलेले निर्देश लक्षात घेता व याबाबत उपलब्ध असलेली माहिती प्रदान केलेली असल्यामुळे प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
★नागपूर★

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २०.०२.२०२३**

जावक क्रमांक 4374, दिनांक 19 JUL 2023